दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

वर्ष २० वे | अंक २५५ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.१३ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात उभारण्यात येणार : मुख्यमंत्री

## एमएमआरडीए आणि ब्रुकफिल्ड कंपनी यांच्या संयुक्त नेतृत्वात प्रकल्प उभारणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय-अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन ऋछउ धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे ६ एकर जागेवर २० लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर स्थापन केले जाणार आहे. हा करार २० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या




प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे.

सदर प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच ३०,००० हून अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी. एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, ही उभारणी महाराष्ट्रातील गुंतवणूकदार-अनुकूल वातावरणाबाबत जागतिक कंपन्यांचा वाढता विश्वास अधोरेखित करणारी आहे. प्रकल्पासाठी १०० टक्के हरित उर्जेचा वापर करण्याचे उद्दिष्ट असून इमारत बाजारातील सर्वोत्तम शाश्वत बांधकाम मानकांनुसार उभारली जाणार आहे. यामुळे मुंबईचे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर हब म्हणूनचे स्थान आणखी मजबूत होणार आहे.

२०२४ मध्ये ब्रुकफिल्डने पुण्यात एका मोठ्या वित्तीय सेवा कंपनीसाठी 'बिल्ड-टू-सूट' टॉवर उभारला होता. याच वर्षी MMRDA सोबत १२ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. जून २०२५ मध्ये कंपनीने बांद्रा-कुर्ला संकुलात २.१ एकर जागा खरेदी केली आहे.

ब्रुकफिल्डचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी अंकुर गुप्ता म्हणाले , आशिया खंडातील कार्यालय विकास क्षेत्रात नवा मापदंड ठरेल असा हा आयकॉनिक प्रकल्प आम्ही उभारत आहोत. मुंबईत करण्यात आलेली गुंतवणूक आता ४ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. उच्च दर्जाची, शाश्वत आणि आधुनिक कार्यस्थळे निर्माण करण्यासाठी ब्रुकफिल्ड कटिबद्ध आहे. ब्रुकफिल्ड ही भारतातील सर्वात मोठ्या कार्यालयीन मालक आणि ऑपरेटर कंपन्यांपैकी एक असून देशातील सात शहरांमध्ये सुमारे ५५ दशलक्ष चौरस फूट क्षेत्राचे व्यवस्थापन करते. उच्च दर्जाच्या, ग्रेड-- प्रकल्पांची विकास व संचालन क्षमता कंपनीने सातत्याने सिद्ध केली आहे. पवईतील प्रस्तावित प्रकल्पाला उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी, सामाजिक सुविधा व मोठ्या प्रमाणातील कुशल मनुष्यबळाचा लाभ मिळणार आहे.

# प्रचंड गर्दी अन् रेटारेटीत लोकल प्रवास करणाऱ्या बदलापूरकरांना दिलासा नाहीच

**दै.रायगड नगरी । बदलापूर**

बदलापूर ते मुंबई प्रवास करणाऱ्या हजारो दैनंदिन प्रवाशांसाठी लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची मागणी सध्या मान्य होणार नसल्याचे रेल्वेने स्पष्ट केले आहे. खासदार सुरेश म्हात्रे यांनी वाढत्या गर्दीचा आणि होणाऱ्या रेटारेटीचा विचार करून या मार्गावर अतिरिक्त लोकल फेऱ्या सुरू करण्याची विनंती केली होती. मात्र, कल्याण-कर्जत मार्ग आधीच १०० टक्के क्षमतेने चालत असल्याने सध्या कोणतीही अतिरिक्त सेवा देणे अशक्य असल्याचे रेल्वेने अधिकृतपणे कळवले आहे.

दररोज बदलापूरसह आसपासच्या भागातून मोठ्या संख्येने नागरिक कामानिमित्त मुंबईकडे प्रवास करतात. सकाळी ६ ते १० या गर्दीच्या वेळेत प्रवाशांची संख्या अत्यंत जास्त असते. याच काळात अधिक लोकल सुरू करण्याची मागणी सातत्याने होत होती. ३ नोव्हेंबर रोजी खासदारांनी रेल्वेला पत्र पाठवून ही मागणी मांडली होती. अखेर २८ नोव्हेंबर रोजी रेल्वेचे औपचारिक उत्तर प्राप्त झाले, ज्यात infrastructural मर्यादांमुळे ही मागणी पूर्ण करणे शक्य नसल्याचे नमूद करण्यात आले.

कल्याण-कर्जत मार्गावर सध्या दररोज २४२ ट्रेन धावत आहेत. यात लोकल, मालगाड्या आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांचा समावेश आहे. रेल्वेच्या मते, या मार्गावरील ट्रॅक क्षमता पूर्णपणे वापरली जात असल्याने आणखी लोकल फेऱ्यांसाठी जागाच उरत नाही. सकाळच्या गर्दीच्या वेळेत बदलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस यांदरम्यान आधीच १६ लोकल फेऱ्या चालवल्या जातात.

मात्र, यापेक्षा अधिक फेऱ्या सुरू करण्यासाठी रेल्वे सध्या असमर्थ आहे.

रेल्वेने पुढे स्पष्ट केले आहे की, या मार्गावर तिसरी आणि चौथी मार्गिका तसेच कल्याण यार्ड रिमॉडेलिंगची कामे पूर्ण होईपर्यंत अतिरिक्त लोकल सेवा सुरू करणे शक्य नाही. ही कामे पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त क्षमतेचा विचार करता येईल. तोपर्यंत प्रवाशांना सध्याची गर्दी आणि गैरसोयी सहन करतच प्रवास करावा लागणार आहे.

रेल्वेच्या उत्तरामुळे बदलापूरकरांच्या अपेक्षांवर पाणी फिरले असून आरामदायक आणि गर्दीविरहित प्रवासाची स्वप्ने आणखी पुढे ढकलली गेली आहेत. ही परिस्थिती किती काळ कायम राहणार, याबाबत प्रवाशांमध्ये मोठी निराशा पसरली आहे.

# १६ डिसेंबरला महाविकास आघाडीचा पनवेल महानगरपालिकेवर भव्य मोर्चा




**दै.रायगड नगरी । पनवेल**

काँग्रेस भवन पनवेल येथे शुक्रवार दि. १२ डिसेंबर रोजी महाविकास आघाडीच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. पनवेल शहरातील विविध महत्त्वपूर्ण नागरी प्रश्न, महापालिकेची धोरणे आणि नागरिकांवर वाढत असलेला ताण याबाबत या पत्रकार परिषदेत आघाडीतील नेत्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पनवेल महानगरपालिकेचा वाढीव मालमत्ता कर, शहरातील रस्ते, पाणीटंचाई, तळोजा एमआयडीसी परिसरातील गंभीर प्रदूषण यांसह अनेक तातडीच्या समस्यांकडे लक्ष वेधले. तसेच महापालिका क्षेत्रात उभारण्यात आलेल्या अवास्तव आणि बस थांब्यांबाबतही महाविकास आघाडीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

या सर्व प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी मंगळवार दि. १६ डिसेंबर रोजी पनवेलमध्ये भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली. या मोर्चात महाविकास आघाडीतील राज्यपातळीवरील प्रमुख नेतेही सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले.

नागरिकांवरील वाढता भार आणि महापालिकेच्या हलगर्जीविरोधात मोठ्या प्रमाणावर जनतेचा सहभाग अपेक्षित असल्याचेही नेत्यांनी सांगितले.

याचबरोबर विमानतळाच्या नामांतराविषयी महत्त्वाची माहिती देताना व्यासपीठावर उपस्थित नेत्यांनी सांगितले की, २५ डिसेंबरपासून नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रत्यक्ष उड्डाणांची सुरुवात होणार आहे. या विमानतळाला लोकनेते स्व. दि बा पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठीही महाविकास आघाडीने जोरदार भूमिका मांडली आहे. या मागणीसाठी खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, जिल्हाप्रमुख शिरिष घरत, माजी आमदार बाळाराम पाटील, पनवेल काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते नारायण घरत, शेकाप विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, मनसे प्रवक्ते तथा पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, माजी नगरसेविका लीना गरड यांच्यासह महाविकास आघाडीतील घटकपक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वस्तात रूम देतो असे सांगून १३ लाख रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वस्तात रूम विकत देण्याचे आमिष दाखवून पनवेलमधील एका बांधकाम व्यावसायिकाने पाच जणांकडून १३ लाख रुपये उकळून त्यांना रूम अथवा त्यांची रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

हनुमंत पांडुरंग चव्हाण असे या बांधकाम व्यावसायिकाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी' त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. मुंबईतील घाटकोपर येथे राहणारे गणेश डोईफोडे यांना सप्टेंबर २०२३ मध्ये स्वस्त दरात गुंतवणुकीसाठी घर घ्यायचे होते, त्यावेळी एका मित्राच्या माध्यमातून डोईफोडे यांची आरोपी हनुमंत चव्हाण याच्याशी ओळख झाली होती. साईराज कन्स्ट्रक्शन बिल्डर अँड डेव्हलपर्सचा संचालक असल्याचे सांगणाऱ्या हनुमंत चव्हाण याने त्यावेळी पनवेलमधील मौजे कोळखे गाव येथील ओम साई होम या बांधकाम सुरू असलेल्या इमारतीतील पाच रूम विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले होते.

डोईफोडे यांनी ३०१ आणि ३०२ क्रमांकाच्या दोन रूमचे बुकिंग करून हनुमंत चव्हाण याच्या खात्यावर ५ लाख ५० हजार रुपये पाठवून दिले. उर्वरित रक्कम रजिस्ट्रेशनच्या वेळी देण्याचा व्यवहार ठरला. त्यानंतर डोईफोडे यांनी डॉ. सीताराम म्हस्के आणि प्रकाश भोसले या दोन मित्रांना या रूमबाबत माहिती दिल्यानंतर त्यांनीही हनुमंत चव्हाण याच्या ओम साई होम या इमातीतील रूम घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी अनुक्रमे ३०३, ४०२ आणि ४०३ क्रमांकाच्या रूमसाठी ७ लाख ५० हजार रुपये चव्हाणला दिले. हनुमंत चव्हाण याने ज्या ५ रूम विक्री करण्याच्या बहाण्याने या तिघांकडून १३ लाख रुपये उकळले, ते २ मजल्याच्या वर असल्याने या रूम अनधिकृत असल्याचे उघड झाले. त्यानंतर या तिघा मित्रांनी पनवेल शहर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# पनवेल येथे माथेरानच्या मुख्याधिकाऱ्यांच्या घरी चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माथेरान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल महादेव इंगळे यांच्या सेक्टर १४, सिडको वसाहत, नवीन पनवेल येथील घरात चोरांनी चोरी करत २५ ग्राम वजनाची सोन्याची गंठण चोरून नेली. या प्रकरणी सहा डिसेंबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

राहुल इंगळे हे माथेरान नगर परिषदेचे मुख्याधिकारी असून ते सेक्टर १६, पिल्लाई कॉलेज जवळ, नवीन पनवेल येथे राहतात. त्यांच्या मालकीची सदनिका, सेक्टर १४, नवीन पनवेल येथे आहे.

त्या घरात त्यांनी २५ ग्रॅम वजनाचे आईचे सोन्याचे गंठण ठेवले होती. सहा डिसेंबर रोजी सेक्टर १४ येथील घराचे कडी कोयंडा तुटलेले दिसले. आत मध्ये जाऊन पाहणी केली असता कपाटातील सोन्याची गंठण सापडून आली नाही.

# तब्बल २ कोटी रुपयांचा अवैध विक्रीसाठी आणलेला गुटखा खारघर येथे करण्यात आला नष्ट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई अमली पदार्थ विरोधी पथकाने जुलै महिन्यात भिवंडी आणि कामोठे परिसरातून अवैध विक्रीसाठी आणलेला तब्बल दोन कोटी ७२ लाख रुपये किमतीचा गुटखा न्यायालयाच्या आदेशानुसार गुरुवारी खारघर डोंगरात जाळून नष्ट केला.

नवी मुंबई अमली पदार्थ विरोधी पथकाला कामोठे येथे एका टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. पथकाने तात्काळ कारवाई करत टेम्पो चालकाला ताब्यात घेतले. या चालकाने हा गुटखा भिवंडी येथून मिळाल्याचे सांगितले. त्या माहितीच्या आधारावर, पथकाने भिवंडी येथे धाड टाकली. यावेळी अवैध विक्रीसाठी आणलेला गुटखा चार कंटेनरमध्ये आढळून आला. पोलिसांनी हा सर्व गुटखा, टेम्पो आणि चार कंटेनर ताब्यात घेतले आणि या प्रकरणी पाच संशयितांना अटक केली होती.

न्यायालयाच्या निर्देशानुसार, हा जप्त केलेला मोठा साठा खारघर ओवे कॅम्प येथील तलावाशेजारी मोठा खड्डा खोदून जाळून नष्ट करण्यात आला. या वेळी कोणतीही पर्यावरणीय हानी होऊ नये यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती. या वेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक सूरज गोरे यांच्यासह पोलिस कर्मचारी अंकुश म्हात्रे, कृष्णा धोंडे, रमेश तायडे, परमेश्वर भाबड, तुकाराम सोनवलकर हे उपस्थित होते.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंगची समस्या गंभीर, शाळा प्रशासनाने ग्राउंडच्या बाजूने खोदला चर

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन ।** श्रीवर्धन समुद्रकिनारी वाहने पार्किंग करण्यासाठी गंभीर समस्या निर्माण झाली आहे. मागील अनेक दिवसांपासून र.ना. राऊत विद्यालयाचे पटांगण पार्किंगसाठी वापरण्यात येत होते. परंतु या पटांगणामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर सतत पार्किंग केलेल्या गाड्यांमुळे शालेय विद्यार्थ्यांना खेळ खेळता येत नव्हते. सदरची मैदानाची जागा ही एका देण-गीदाराने शालेय विद्यार्थ्यांना खेळासाठी दिली असल्याकारणाने शाळा प्रशासनाने पटांगणाच्या बाजूला चर खोदून घेतला आहे. जेणेकरून गाड्या आत मध्ये जाऊन पार्किंग करता येणार नाहीत.



श्रीवर्धन येथील शासकीय विश्रामगृहाच्या प्रवेशद्वारापासून पर्यटकांच्या खाजगी गाड्या रस्त्याच्या दुतर्फा उभ्या केलेल्या असतात. त्यामुळे समुद्रकिनाऱ्याकडे येणे जाणे अशक्य होऊन बसते. त्यातच अनेक मोठ्या बसेस, सहलीच्या बसेस देखील या ठिकाणी घुसल्यानंतर पूर्णपणे वाहतूक कोंडी होऊन जाते. अशीच परिस्थिती फेस्टिवल बीच परिसरात देखील उद्भवते. त्या ठिकाणी असलेल्या अवधूत मंदिराजवळ उत्तर कार्य करण्याच्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात पार्किंग केलेल्या गाड्यांमुळे वाहतूक कोंडी नित्याची होऊन बसते.

याच अवधूत मंदिराच्या पुढे मठाची स्मशानभूमी असून, श्रीवर्धन शहरात कोण्या व्यक्तीचे मयत झाल्यास त्या ठिकाणी पार्किंग असलेल्या गाड्यांमुळे मयत घेऊन जाण्यास देखील अडथळा निर्माण होतो. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा बांधलेला असून, दक्षिणेच्या दिशेला धूप प्रतिबंधक बंधारा ज्या ठिकाणी संपतो. त्या ठिकाणी हेलीपॅड बांधण्यात आलेले आहे. या हेलिपॅड च्या बाजूला वनखात्याच्या अखत्यारीत असलेली बरीचशी जागा पडून आहे. ही जागा पार्किंगसाठी उपलब्ध करून दिल्यास, येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांना पार्किंगची सुविधा उपलब्ध होईल. तरी श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी तातडीने लक्ष घालून सदरची वनखात्याची जागा पार्किंगसाठी उपलब्ध करून देऊन, त्या ठिकाणी पे अँड पार्कची सुविधा उपलब्ध करावी. अन्यथा श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांना कोणत्याही ठिकाणी वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याचे दिसून येते.त्यामुळे पर्यटकांची नाराजी पर्यटन वाढीला बाधक ठरु शकते.

## न संपणारा घोळ

नगरपालिका, नगरपंचायत निवडणुका मतदारयादीतील घोळामुळे गाजल्या. आता महापालिका निवडणुकीत त्याच घोळाची पुनरावृत्ती होणार, असे संकेत दिसत आहेत. राज्यातील २९ महापालिकांमधील अंतिम मतदारयाद्या प्रसिद्ध करण्याची तारीख १० डिसेंबर होती. आता पाच दिवस विलंबाने म्हणजे १५ डिसेंबर रोजी मतदारयाद्या प्रसिद्ध होतील. त्यानंतर मतदानाच्या तारखांची घोषणा होईल. निवडणुका होतील. जे विजयी होतील ते मतदारयाद्या, निवडणूक यंत्रणा यांच्या पवित्रतेबद्दल व सात्त्विकतेबाबत गोडवे गातील. जे पराभूत होतील ते बोटे मोडतील व कदाचित शिव्याशापही देत बसतील. मतदारयाद्या, मतदान यंत्रे व निवडणूक प्रक्रिया याविरुद्ध काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सर्वप्रथम आवाज उठवला. मतदारयादीतील घोळाची उदाहरणे दिली. निवडणूक आयोगाने या दाव्याला उत्तर देण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे नेतेच प्रतिवाद करताना दिसले. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यावर उद्धवसेनेचे नेते आदित्य ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही मतदारयाद्यांमधील घोळाविरुद्ध गांधी यांच्या सुरात सूर मिसळला. काही शहरांत शिंदेसेनेनेही मतदारयाद्या सदोष असल्याचा आवाज उठवला. सत्ताधारी पक्षही मतदारयाद्यांवर संशय व्यक्त करू लागल्याने राज्य निवडणूक आयोगाची पंचाईत झाली. अनेक नेत्यांनी राज्य निवडणूक आयोग व आयुक्तांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. वास्तविक आयोग व आयुक्तांचा थेट दोष नाही. राज्यात महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुका जेव्हा जिल्हा प्रशासन म्हणजे जिल्हाधिकारी घेत होते, तेव्हा मतदारयादी नव्याने करण्याची पद्धत होती. माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांनी आपल्या कारकिर्दीत घटनादुरुस्ती करून स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिले, महिलांना आरक्षण लागू केले व निवडणुका घेण्याकरिता स्वतंत्र राज्य निवडणूक आयोग स्थापन करण्याची तरतूद केली. त्यावेळी या आयोगाने आपल्या स्वतंत्र मतदारयाद्या तयार कराव्या, याद्यांमधील दोष दूर करावे, हे अपेक्षित होते. मात्र महाराष्ट्रातील १९९५ मधील तत्कालीन सरकारने राज्य निवडणूक आयोग स्थापन करतानाच आयोगाला आ-पली मतदारयादी तयार करण्याचे अधिकार दिले नाहीत. महापालिका निवडणुकांपूर्वी झालेल्या निवडणुकीत जी मतदारयादी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली राज्यातील निवडणूक विभागाने तयार केली असेल, त्याच यादीच्या आधारे निवडणुका घेण्याची तरतूद केली. विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्लेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांनी ज्या मतदारयादीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते, त्याच यादीच्या आधारे निवडणूक घेणे राज्य निवडणूक आयोगाला क्रमप्राप्त असल्याने हा आयोग विरोधकांच्या टीकेच्या जात्यात भरडला गेला. सध्याच्या मतदारयाद्यांत दुबार नावे आहेत. मतदारयाद्या फोडताना एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात गेली आहेत. बंद पडलेले कारखाने, स्मशानभूमी अशा ठिकाणी शेकडो मतदार दाखवले आहेत. एकाच घरात शेकडो मतदार दाखवण्याची किमया या यादीत असल्याचे दाखले दिले गेलेत. हे दोष दूर करण्याची यंत्रणा आयोगाकडे नाही. ही जबाबदारी आयोगाने महापालिका आयुक्तांवर ढकलली आहे. घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून हे दोष दूर करण्याकरिता पुरेसा कर्मचारी वर्ग व उत्साह महापालिकांमध्येही नाही. त्यामुळे अनेक आयुक्तांनी पाच दिवसांची मुदत मागून घेतल्याने अंतिम मतदारयाद्या जाहीर करण्याची तारीख पुढे ढकलली गेली. मतदारयाद्यांच्या हलगर्जीपणाला जसे सरकार जबाबदार आहे तसेच ते आरक्षणाच्या घोळालाही जबाबदार आहे. १९९४ मध्ये महाराष्ट्राने ओबीसींना २७ टक्के आरक्षण लागू केले. महापालिका निवडणुकांतही आरक्षण लागू केले. २०१० पर्यंत हे आरक्षण लागू होते. कर्नाटकाने महाराष्ट्राच्या धर्तीवर आरक्षण लागू केल्यावर प्रकरण कोर्टात गेले. कोर्टाने अशी भूमिका घेतली की, सरसकट २७ टक्के आरक्षण लागू करता येणार नाही. तसेच आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा ओलांडली जाणे योग्य नाही. २०१८ साली कोर्टाने राज्य सरकारला बजावले होते की, प्रत्येक मतदारसंघात, प्रभागात ओबीसींचे मागासलेपण किती आहे, याचा अभ्यास करण्याकरिता स्वतंत्र आयोग नेमा व त्यानुसार वेगवेगळ्या मतदारसंघात, प्रभागात ओबीसींकरिता आरक्षण लागू करा. आरक्षणाची मर्यादा ओलांडली जाणार नाही हे पाहा. मागील सात वर्षे सरकारने काहीही केले नाही. निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा आरक्षणाचा वाद चिघळला. मतदारयाद्या व राजकीय आरक्षण या दोन्हीबद्दलचे वाद निवडणूक निकालानंतरही संपणार नाहीत.

# खा.सुनील तटकरे साहेबांवर टीका करण्याएवढी अनिल नवगणेची पात्रता नाही : काका नवगणे

**दै.रायगड नगरी । गौतम जाधव**



**वावेदिवाळी इंदापूर ।** सध्या नागपूर अधिवेशनात कॅशबॉम्बचा मुदा गाजत असून त्याचे पडसाद आता रायगड जिल्हात देखील उमटू लागले आहेत.शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष महायुती मध्ये असताना या दोन पक्षाचा रायगड मध्ये कॅशबॉम्ब या विषयावरून वाद विकोपाला गेला आहे.शिवसेना शिंदे गटाचे अनिल नवगणे यांनी खा.सुनील तटकरे यांच्यावर जहरी टीका केली असा या घटनेचा माणगांव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या कार्यकत्यानी जाहीर निषेध केला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजीत पवार गटाचे माणगांव तालुका अध्यक्ष काका नवगणे यांनी शिंदेगटाच्या कार्यकत्याचे नाव न घेता बोलताना सांगितले की खा.सुनील तटकरे यांच्यावर शिव-सेना शिंदे गटाचे अनिल नवगणे यांनी जी जहरी व खालच्या थराला जाऊन टीका केली असता यावर माणगांव तालुका राष्ट्रवादीचे पक्षाचे अध्यक्ष काका नवगणे यांनी देखील अनिल नवगणे यांना जशास तसे उत्तर दिले आहे.त्यांनी बोलताना सांगितले की अनिल नवगणे यांनी जी गरळ ओकली आहे.आनिल नवगणे हे उबाटा शिवसेना पक्षाचे जिल्हा प्रमुख असताना त्यांनी आ.भरत शेठ गोगावले तसेच विकासशेठ गोगावले यांच्या विषय ते काय बोलायचे हे सर्व जनतेने पाहिले आहे. निवडणूकीत हे उबाटा गटात होते ते शरद पवार गटात गेले आता ते शिवसेना शिंदे गटात आले असून आ.भरतशेठ गोगावले यांची मर्जी व त्यांना खूश करण्यासाठी ते खा.सुनील तटकरे यांच्यावर असे घाणेरडे आरोप करत आहे.खा.सुनील तटकरे साहेब यांनी सांगितले आहे की चाळीस पन्नास वर्षाच्या त्याच्या राजकीय कारकिर्दीत असे कोणतेही घाणेरडे कृत्य त्यांनी केले नाही जर केले असतील तर माझी चौकशी लावावी असे देखील त्यांनी सांगितले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे महाराष्ट्र युवक सचिव व भूवन ग्रामपंचायत सरपंच दिपकशेठ जाधव यांनी देखील बोलताना सांगितले की कुठलाच पक्ष बदलायचा ठेवला नाही ते शिंदे गटाचे काही कार्यकत्याने आमच्या खा.सुनिल तटकरे साहेबांनवर घृणास्पद टीका करतात त्याचा आम्ही जाहीर पणे निषेध करतो.खा.तटकरे यांच्या विषय जे कोणी शिंदेगटाचे कार्यकर्ते बोलले त्यांनी त्याची पाञता काय हे ओळखावी ज्याची पाञता नाही आणि कुठलाच पक्ष ज्यानी बदलायचा ठेवला नाही अशा कोण्यातरी आय-या गैय-यानी शिंदे गटाच्या कार्यकत्यानी खा.सुनिल तटकरे साहेबांनवर बोलणे म्हणजे सुर्यावर थूकने असे झाले आहे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपध्यक्ष शेखरशेठ देशमुख,इंदापूर माजी.उपसरपंच उदय अधिकारी,बाळा खातु,नितिन घोणे,महेश महाजन,शुक्रदास मोरे यावेळी उपस्थित होते.

# बालकामगाराची सुटका ; मालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातील पथकाने पनवेल एसटी बस स्टॅण्डसमोरील महाराजा स्वीट या दुकानावर छापा मारुन एका बालकामगाराची सुटका केली. या बालकामगाराला कमी वेतनात अतिश्रमाचे काम देऊन त्याला राबवून घेणाऱ्या दुकानाच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याच्यावर पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

प्राप्त माहितीच्या आधारे, दुकाने निरीक्षक गजानन जोंधळे, सरकारी कामगार अधिकारी स्नेहल माटे, चाईल्ड लाईनचे प्रतिनिधी प्रकाश पवार व त्यांच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने महाराजा स्वीट या मिठाईच्या दुकानावर छापा मारला. या वेळी या ठिकाणी १६ वर्षीय मुलगा काम करत असल्याचे निदर्शनास आले. या मुलाची सुटका करून महाराजा स्वीट दुकान मालक नथुराम चौधरी याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याच्यावर पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

## पनवेल महानगरपालिका

**वैद्यकीय आरोग्य विभाग**

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६.**

**दुरध्वनी कार्यालय :** ०२२- २७४५८०४०/४१/४२ **फॅक्स नं.:** ०२२-२७४५२२३३
**उपायुक्त कार्यालय :** ०२२-२७४५५७५१ **आयुक्त कार्यालय:** ०२२- २७४५२३३९
**ई-मेल:** panvelcorporation@gmail.com **वेबसाईट:** www.panvelcorporation.com

**जाहिर सुचना**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुत्रपिंड आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांना पालिकेमार्फत मोफत डायलेंसीस सेवा उपलब्ध करुन देणेकामी पालिकेने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र प्लॉट नं. १७, सेक्टर-३६, खारघर व जी १, सेक्टर - ०७, नवीन पनवेल येथील नवीन इमारतीमध्ये ०२ डायलॅसीस युनिट (प्रत्येकी २५ खाटांचे) सेंटर कार्यान्वित करण्यात येणार आहे. या डायलेसिस युनिटमधील उपचार घेण्याऱ्या रुग्णांना Medical Oxygen Gas अशा मेडिकल गॅसची आवश्यकता भासणार असल्याने दोन्ही डायलेसिस सेंटर मध्ये Medical Oxygen Gas, Medical air Gas Vacuum करिता पाईपलाईन पालिका स्तरावरुन उपलब्ध करुन घेणेकरिता एजन्सीची नेमणुक करण्यात येणार आहे. याकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने याकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील नमुद केलेल्या बार्बीकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | MEDICAL GAS PIPING SYSTEM FOR PROPOSED DI-LYSIS CENTER on Contract basis. (Plot no.17, Sector 36, Kharghar व G1, Sector - 07, New Panvel) | १२/१२/२०२५ ते १९/१२/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत |

सविस्तर जाहिर सुचना पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईट वरती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**सही**
**(प्रसेनजीत कारलेकर)**
**उपायुक्त (वैद्यकीय)**
**पनवेल महानगरपालिका**

# पर्यावरण सेवा योजनेंतर्गत लोकनेते दि.बा पाटील शाळा कामोठेमध्ये महापालिकेकडून विविध स्पर्धांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय स्तरावर व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी शासन निर्णयाद्वारे राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना पनवेल महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक १२ डिसेंबर रोजी लोकनेते दि.बा पाटील शाळा कामोठे येथे विविध स्पर्धा व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण सेवा योजना महापालिकेच्या वतीने पालिका कार्यक्षेत्रातील माध्यमिक विद्यालयांमध्ये व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या पर्यावरण सेवा योजनांतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार कृतीकार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत.

पर्यावरण सेवा योजनेंतर्गत आज लोकनेते दि.बा पाटील शाळेमध्ये या योजनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

'कचरा व्यवस्थापनाबाबत माहिती देण्यात आली. तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. याबरोबरच पर्यावरण संवर्धनावर आधारित व्हिडीओ विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.



# पनवेल महानगरपालिकेमार्फत सोमवारी 'महिला सक्षमीकरण व बचत गट उत्पादन मेळाव्याचे' आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिका क्षेत्रातील महिलांना स्वावलंबी व सशक्त बनवण्यासाठी , व्यवसायिक व सामाजिक कौशल्य वाढविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेमार्फत महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'महिला सक्षमीकरण व बचत गट उत्पादन मेळावा' सोमवारी १५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यांतर्गत बचत गट व्यवस्थापन याविषयावरती व्यवसाय वृध्दी मार्गदर्शक तज्ज्ञ डॉ. पुनम हुद्दार व कायदेशीर मार्गदर्शन करण्यासाठी ड. सरस्वती कदम यांना आमंत्रित करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाद्वारे महिलांना प्रत्यक्ष मार्गदर्शन, प्रशिक्षण व प्रोत्साहन मिळून त्यांच्या बचत गटांच्या उपक्रमांना चैतन्य मिळणार आहे. बचत गट व्यवस्थापन, उत्पादकता वाढ, विपणन कौशल्य, तसेच आर्थिक स्वावलंबनाबाबत महिलांना मार्गदर्शन मिळणार आहे. याचबरोबर महिलांविषयक कायद्यांविषयी माहिती मिळणार आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणून सांस्कृतिक कार्यक्रम 'श्री तिथं सौ' हा कविता, किस्से व गाण्यांच्या मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम चेतना भट, संगीतकार अमीर हडकर, गीतकार मंदार चोळकर, पार्श्वगायक स्वप्निल गोडबोले, मयुरा परांजपे, निवेदक परेश दाभोळकर हे उपस्थितांचे मनोरंजन करणार आहेत.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**निविदा सूचना क्र. १९ सन २०२५-२६**

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४, (दुरध्वनी क्र.०२२-२७५७१५३४) योग्य सार्वजनिक बांधकाम विभागातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता (ब-१) जमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा प्रपत्र, पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयातून दि. १३/१२/२०२५ ते वि. २२/१२/२०२५ दु.१५.०० पर्यंत देण्यात येईल. भरुन पाठविलेल्या सिलबंद निविदा दि. २२/१२/२०२५ दुपारी १६.०५ वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी दुपारी १६.३० वाजेपर्यंत उघडतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रुपये) | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत (रुपये) ना-देय |
|---|---|---|---|
| १ | वढाव काळेश्री बंदराजवळ प्रसाधनगृह बांधणे, ता. पेण.जि. रायगड | ४,२२,५५७/- | रु.५९०/- |

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल एक किवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. पअउ/का-२/निविदा /२२१८/२०२५
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक : १२/१२/२०२५
क्र.जिमाका/राअ/जाहि/३११/२०२५-२६

**सही/-**
**पत्तन अभियंता,**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),**
**कोंकण भवन, नवी मुंबई**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# रायगडात वातावरणीय बदलामुळे वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्याकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यानाही बसल्याचे चित्र रायगड जिल्ह्यातून समोर येत आहे. कारण आतापर्यंत वालाच्या शेंगाचे उत्पादनच झालेले नाही. त्यामुळे शेंगा प्रेमींना, खवय्यांना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे. तत्पूर्वी वालाच्या शेंगांची आवक मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती.

मात्र मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधून मधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान सद्यस्थितीत रायगड मधील भाजीपाला बाजारातील उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा ह्या अधिकतम बाहेरील जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगा प्रेमीच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीणमधील गावठी शेंगांच्या पोपटीच्या माध्यमातून चवीचा आस्वाद घेता घेत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांची हिरमोड होत असून असे ग्राहक बाजारात येणाऱ्या शेंगा खरेदी करण्यास कानाडोळा करत असून गावठी शेंगांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे.

भात कापणीनंतर लागवड केलेल्या वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते.परंतु मागील काही वर्षांपासून च्या अवकाळीने भातशेतीसह भाजीपाला, कडधान्याया अक्षरशः चुराडा केला असतानाच आत्ता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने कडधान्ये, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असाल्याने शेतकयांना नुकसान सहन करावा लागत आहे.

अलीकडील बदलत्या हवामान स्थितीचा पिकांवर परिणाम होत असून महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात चालू हंगामात पावसाचा कालावधी अपेक्षेपेक्षा मोठ्या प्रमाणात लांबल्यामुळे जमिनीत जास्त काळ ओलावा टिकून राहिला. खरीप पिकांपैकी भात कापणीस विलंब झाला, याचा थेट परिणाम म्हणून रब्बी हंगामातील कडधान्य पिकांच्या पेरणीस उशीर झाला. विशेष म्हणजे खरीपातील वाल व कडधान्ये पिकांच्या जातीवरती या हवामान बदलाया प्रतिकूल परिणाम झाला आहे.दीर्घकाळ ओलावा व सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे या पिकांत फुलोरा येण्यास विलंब झाला असून पिकांची घात मंदावलेली दिसून येत आहे.




## दैनिक रायगड नगरी

**बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम**

**संपर्क : ९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**


**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**

### अपर तहसिलदार कार्यालय पनवेल

**दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड पिन: ४१०२०६**
E mail: uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/मृत्यू/६४२७/२०२५ दि.१२/११/२०२५

### नोटीस

विषय:- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.
संदर्भ :- अर्जदार श्री. प्रल्हाद रघुनाथ गायकवाड, यांचा दि. १९/११/२०२५ रोजीचा अर्ज

उपरोक्त विषयाकामी अर्जदार श्री. प्रल्हाद रघुनाथ गायकवाड, रा. पो. देविचापाडा, मराठी शाळा जवळ, ता. पनवेल, जि. रायगड रायगड यांनी त्यांची बहिण कै. सरीता उर्फ साक्षी प्राण उर्फ संकेत जाधव यांचा उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक १६/०१/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. सबब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनावणी पुर्वी सादर करावी. सुनावणी नंतर हरकत प्राप्त झाल्यास मान्य करण्यात येणार नाही. हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(जितेंद्र मा इंगळे पाटील)**
**अपर तहसीलदार पनवेल**

बडगुजर सो
वकील : स्नेहल महादेव भोसले

### जाहीर नोटीस

वारसाच्या सर्टिफिकेट बद्दल पनवेल येथील
दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) पनवेल यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१४७४/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१४/०१/२०२६

श्रीमती. रंजु आझाद चौधरी
वय: ५१ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
श्री. संजीव आझाद चौधरी
वय: ३५ वर्षे, व्यवसाय नोकरी
कु. अजित आझाद चौधरी
वय: ३४ वर्षे, व्यवसाय-
च्या वतीने पालकत्व म्हणून
श्रीमती रंजु आझाद चौधरी अर्जदार

ज्या पेक्षा अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार क्र. १ यांचे पती तसेच अर्जदार क्रं. २ व ३ यांचे वडील, मयत कै. आझाद चौधरी यांचे दिनांक २४/१२/२०२४ रोजी ठिकाण एम.जी.एम. न्यू बॉम्बे हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र, येथे निधन झाले. अर्जदार यांनी कोर्टास सदरहू मयतांचे वारसदार म्हणून अर्ज केला आहे. त्याच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

अ. अपार्टमेंट नं. के.एल. २/४/०:२, मिळकतीचे क्षेत्रफळ १७.०० चौ.मी/१८२.९२ चौ. फूट बि. क्षे., सेक्टर नं. ५, कळंबोली, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२१८.

ब. फ्लॅट नं. १५, प्रतिभा को. ऑप. हौ. सो (सब प्लॉट नं. १५) प्लॉट नं. एफ ८२, सेक्टर नं. १२, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०.

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचादाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्यादाखल्या बाबत ज्याकोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत हया न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचादाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १२/१२/२०२५ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे. श्री इंटरप्राईजेस तर्फे प्रो.प्रा. श्री. सुरजकुमार शर्मा पत्ता: शॉप नं. ४, सिल्वर इस्प्रिंग रेसिडेन्सी, प्लॉट नं. १६५, सेक्टर - २४, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६, यांनी श्री. सुनील कुमार अशोक अमीन पत्ता: शॉप नं. ४, सिल्वर इस्प्रिंग रेसिडेन्सी, प्लॉट नं. १६५, सेक्टर २४, उलवे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६, यांचा खालील क्षेत्र ३७० चौ.मी. भुखंडामधील क्षेत्र १८५ चौ.मी. पैकी अविभाज्य भाग (५० टक्के) भुखंड आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी सिडको त्रिपक्षीय करारान्यये हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**नोड पुष्पक (वहाळ), ता. पनवेल, जि. रायगड.**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २५ ए | २०६ एफ | क्षेत्र ३७० चौ.मी. भुखंडामधील क्षेत्र १८५ चौ.मी. पैकी अविभाज्य भाग (५० टक्के) भुखंड |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी नमदु केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दि.११/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर - १ए, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई - ४०० ६१४.**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमुद केलेल्या परिशिष्टामध्ये वर्णन केलेला युनिट माझे आशिल श्री. अनिल आसाराम काकडे, राहणार - ए टाईप, सेक्टर १३/७०/४, नवीन पनवेल, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६ (महाराष्ट्र) हे खरेदी-विक्री करताना करून प्रस्तुत मालक - श्री. दुवाखान महंमदभाई मोळकर, राहणार - ५१, बी, प्रतापगंज पेठ, ओम गणेश अपार्टमेंट, सातारा - ४१५००२ (महाराष्ट्र) यांच्याकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर युनिटच्या मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

**मिळकतीचे वर्णन**

| भूखंड क्रं. | युनिट क्रं. | सोसायटी | क्षेत्रफळ | सेक्टर क्र. | ठिकाण नोड |
|---|---|---|---|---|---|
| ए-४ | २४ | चैतन्य को. ऑप. हौ. सो.लि. | २८.०० चौ.मी. बांधीव | ०६ | नवीन पनवेल (पूर्व), ता.पनवेल, जि.रायगड |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमुद केलेल्या युनिट मिळकतीमधील हिस्सावर वा भागावर कोणीही व्यक्तिचे कसल्याही प्रकारचे करार, मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरूपी हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तिंनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा, न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर सब प्लॉट /युनिट मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

कळावे,
ठिकाण : पनवेल
दि.१२/१२/२०२५

**सही/-**
**वकील : श्री.आर.आर.भोईर**
**बी.कॉम., एलएल. बी.,**

**मुख्य कार्यालय : शॉप नं.३७, नॅशनल कॉम्प्लेक्स सीएचएस, प्लॉट नं.बी-११/१२, सेक्टर : ६, विजय मार्ग, एम टी एन एल जवळ, नवीन पनवेल (पुर्व), ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६**
**शाखा कार्यालय : ०१ आणि ०२, प्लॉट नं.४२, सेक्टर ५अ, विजय मार्ग, सब रजिस्टर ऑफिस मागे, नवीन पनवेल (पुर्व), ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६ मो. नं. ९८३३३७७७३६**


### वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जव्य विभाग पनवेल**
**ई-निविदा सुचना क्र. ०३, सन २०२५-२६ (दुबार मागणी)**

देखभाल व दुरुस्ती माथेरान पाणी पुरवठा योजना, ता. कर्जत, जि. रायगड, उल्हास नदी उद्धवावरील पपींग हाऊस व दैनंदिन देखभाल व दुरूस्तीकरीता मनुष्यबळ पुरविणे. या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहेत. कामाची अंदाजित किंमत रू.१,११,५५,४१३/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १५/१२/२०२५ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार रहतील,

दिनांक :- १२/१२/२०२

**सही/-**
**(एस.पी. वेंगुर्लेकर)**
**कार्यकारी अभियंता**
**म.जी.प्रा.ज.व्य. विभाग**
**नवीन पनवेल.**

क्र.आरओसी-२०२५-२६/क्र.५/सी ४५५६

ॲड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३

### जाहीर नोटीस

मे. पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१४९६/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०२/२०२६

श्रीमती. शारदा मोहन शिलवंत व इतर तीन अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

वरील अर्जदार नं १ यांचे पती ते अर्जदार नं २ ते ४ यांचे वडील कै. श्री मोहन सोनाजी शिलवंत हे दिनांक १८.०९.२०२१ रोजी तेरणा स्पेश्यालिटी हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर सेक्टर २२, नेरूळ, नवी मुंबई येथे निधन झाले असून अर्जदार १. श्रीमती शारदा मोहन शिलवंत, २. श्री. मिलिंद मोहन शिलवंत ३. श्री. प्रशांत मोहन शिलवंत सर्व रा. फ्लॅट नं. ए/३०१, कावेरी को ऑप हाऊसिंग सोसायटी लिमिटेड प्लॉट नं ४, उत्सव चौक जवळ, सेक्टर ५, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र ४१०२१०,४. सौ. कविता संजय सपकाळ राहणार : बंगला नं २४, गोपाळवाडी रोड, गणेश हौसिंग सोसायटी, दौंड, पुणे महाराष्ट्र ४१३८०१. हयांनी वारस म्हणून वारात्रसांचा वारसदाखला मिळणे बाबत मे. न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत कै. श्री मोहन सोनाजी शिलवंत यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मालमत्ता परिशिष्ट अ**

कै. श्री मोहन सोनाजी शिलवंत (५० टक्के भाग)

फ्लॅट नं. ए/३०१, कावेरी को ऑप हाऊसिंग सोसायटी लिमिटेड प्लॉट नं ४, उत्सव चौक जवळ, सेक्टर ५, खारघर, नवी मुंबई ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१० क्षेत्र : ३६५.३६ चौ. फुट

मालमत्ता मूल्यांकन : ५,२०,०००/- (अक्षरी पाच लाख वीस हजार मात्र)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेवावत मे न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्यां कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तकार वगैरे असल्यास तशी लेखी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारच्या विनतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ११/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे - बोरी बुद्रुक, ता. उरण, जि. रायगड येथील महसुल दप्तरी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत आमचे आशिल श्री. किरण विठ्ठल साळुंके आणि श्रीम. निता शिवाजी शिंदे यांनी १) श्री. कमळाकर शंकर म्हसकर २) श्रीम. जयवंती राजन ठाकूर ३) श्री. जोमा शंकर म्हसकर ४) श्रीम. बारकीबाई शंकर म्हसकर ५) श्री. चंद्रकांत काळूराम म्हसकर ६) श्रीम. नलिनी काळूराम म्हसकर ७) श्रीम. चैताली संजय तांडेल ८) श्रीम. समिता महेश ठाकूर ९) श्रीम. सेजल महेश ठाकूर १०) श्रीम. वैजयंती विनोद ठाकूर ११) श्रीम. रामूबाई विठ्ठल पाटील रा. बोरी बुद्रुक, ता. उरण, जि. रायगड यांचे कडून सदर जमिन मिळकतीमधील त्यांचा अविभाज्य हिस्साचे क्षेत्र कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - बोरी बुद्रूक, ता. उरण, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २३ | ०२ | ०-५५-४०<br>पो.ख. ०-२८-००<br>०-८३-४०<br>एकूण क्षेत्रापैकी ०-७१-००<br>इतके अविभाज्य हिश्श्यांबाबत | ६.५० |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विकी, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबधीची व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वताःहून हजर होऊन आमचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध नाही. किंवा असल्यास तो हक्क हितसंबध त्यांनी आमचा अशिलांच्या लाभात सोडून दिला असून त्याची आमच्या आशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकती घेतल्यास ती हरकत आमच्यावर आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.१२/१२/२०२५
स्थळ : पनवेल

**सही/-**
**ॲड. प्रतिक्षा द. पाटील**
**ॲडव्होकेट्स ॲड लिगल कन्सल्टंटस.**
**कार्या बी/१०४, पहीला मजला, पायोनिअर को ऑप, हौसींग सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**

### पनवेल महानगरपालिका
**पशुवैद्यकीय विभाग**
**जाहीर सुचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील रेबीज संशियत व आक्रमक श्वानांना ठेवण्याकरिता उभारण्यात येणाऱ्या शेल्टर देखभालीकामी बाजारभाव दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी सदरचे बाजारभाव दरपत्रक दिनांक २३/१२/२०२५ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांक नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही. या जाहीर सुचना बाबत चा सविस्तर तपशील पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

मे.जागुष्टे सो. यांचे न्यायालयात
ॲड.विशाल ल. डोंगरे, अर्जदारांतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश (व. स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.१३८७/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२३/१२/२०२५

कै. पार्वती परशुराम कोळी मयतचे वारस
१) श्री. रमेश परशुराम कोळी
वय- ५६ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. श्री. सरस्वती चाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, नं. २,
पी. एम.जी.पी. कॉलनी समोर,
बिल्डींग नं. १० समोर, मानखुर्द, मुंबई ४३
२) श्री. प्रकाश परशुराम कोळी,
वय- ५७ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. गणेशपुरी, पो. उलवा, ता. पनवेल, जि. रायगड.
३) श्रीमती. कुसुम हौशा कोळी
वय - ६१ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. मु. कोंबडभुजे, ता. पनवेल, जि. रायगड
४) श्री. मच्छिंद्रनाथ श्रावण उर्फ श्रावणबाळ कोळी,
वय- ४१ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. श्री. सरस्वती चाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, नं. २,
पी. एम.जी.पी. कॉलनी समोर,
बिल्डींग नं. १० समोर, मानखुर्द, मुंबई ४३
५) सौ. अक्षदा मनोहर कोळी पुर्वाश्रमीचे नाव
सौ. अक्षदा श्रावण उर्फ श्रावणबाळ कोळी
वय- ३६ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड
६) सौ. सुषमा महादेव कोळी पुर्वाश्रमीचे नाव
सुषमा श्रावण उर्फ श्रावणबाळ कोळी
वय- ४३ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. गणेशपुरी, पो. उलवा, ता. पनवेल, जि. रायगड.
७) सौ. रूपाली जीवन कोळी पुर्वाश्रमीचे
नाव रूपाली श्रावण उर्फ श्रावणबाळ कोळी
वय - ३९ वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. मु. मोहा, ता. पनवेल, जि. रायगड. अर्जदार
वि.
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. पार्वती परशुराम कोळी ही अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई असुन अर्जदार क्र. ४ ते ७ यांची आजी आहे. कै. पार्वती परशुराम कोळी हयांचे दि. ०३/०४/२०२३ रोजी रोजी बिल्डींग नं. १० समोर, श्री सरस्वती चाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर २, मानखुर्द येथे राहत्या घरी निधन झाले असुन कै. पार्वती परशुराम कोळी यांचे पती कै. परशुराम भुऱ्या कोळी यांचे दि. ०५/०१/१९९१ रोजी निधन झाले आहे. तसेच कै. पार्वती परशुराम कोळी यांचा मुलगा कै. श्रावण परशुराम कोळी यांचे दि. २४/११/१९९३ रोजी मुंबई येथे निधन झाले असुन कै. पार्वती परशुराम कोळी यांची सुन म्हणजचे कै. श्रावण परशुराम कोळी यांची पत्नी कै, नंदाबाई श्रावणबाळ कोळी यांचे दि. २९/०५/२०२५ रोजी रूम नं. ४०४, बालाजी महिमा, शहबाज गाय, सेक्टर १९, बेलापुर, नवी मुंबई, ठाणे येथे निधन झाले आहे. कै. पार्वती परशुराम कोळी यांच्या मृत्यु समयी त्यांच्या मालकीची खालील वर्णनाची मालकीच्या व वहिवाट वापरातील मिळकत होती त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :-

**परिशिष्ट 'अ'**

| भूमी संपादन निवाडा क्रं. | संपादीत केलेल्या जमिनीच्या भूमापन क्रमांक / बांधकाम क्रमांक | संपादीत केलेल्या जमिनी मधील बांधकामाचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकामाचा वापर | निवाड्या प्रमाणे भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | भूखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्रं. | भूखंड क्रं. | क्षेत्र (चौ. मी.) |
| ULWA -6 | ३५/२ GP-79 | ६२.६७ | निवासी | ६२.२७ | उलवे उपरोक्त प्रमाणे | २५A | ४७३ | १९० |

**परिशिष्ट 'ब'**
**मौजे - चेंबुर येथील झोपडी क्र. २०८,**
**वसाहतीचे नाव डॉ. आंबेडकर नगर, मानखुर्द, क्षेत्रफळ २२५ चौ. फु.**

वरील मिळकत ही, कै. पार्वती परशुराम कोळी यांच्या मालकीच्या व वहिवाट वापरातील मिळकत आहे. अर्जदार क्र १ ते ७ हे कै. पार्वती परशुराम कोळी यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट अर्जदार क्र. १ ते ७ हे कै. पार्वती परशुराम कोळी यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर, कै. पार्वती परशुराम कोळी यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०६/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून ३५,३६२ रुग्णांना २९९ कोटींची मदत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात गेल्या वर्षभरात अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सर्व सकारात्मक बदलांचा परिणाम स्पष्टपणे दिसून आला असून, ६ डिसेंबर २०२४ ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यातील ३५ हजार ३६२ रुग्णांना २९९ कोटी ४३ लाख ५२ हजार ४०० वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात आली आहे.

कक्षाच्या वतीने गेल्या वर्षभरात हजारो गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत करण्यात आली. भविष्यात अधिकाधिक रुग्णांना मदत करता यावी, यासाठी त्रिपक्षीय करार, आरोग्य विषयक सर्व शासकीय योजनांचे एकत्रीकरण आदी उपक्रमांमधून गरजू रुग्णांसाठी मदतीचे मार्ग आणखी सुलभ होणार आहेत.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून लाभ मिळवण्यासाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना पूर्वी मुंबईत यावे लागत असे. त्यामुळे वेळ आणि पैसा खर्च होत होता. ही अडचण कायमची दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हा कक्षाची स्थापना करण्यात आली.

या वर्षातील सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाला मिळालेले एफसीआरए प्रमाणपत्र. ही परवानगी मिळवणारा महाराष्ट्रातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष हा भारतातील पहिला कक्ष ठरला आहे. यामुळे आता परदेशातून थेट देणग्या स्वीकारण्याची परवानगी मिळाली आहे.

राज्यातील विविध आरोग्य योजनांचे एकत्रिकीकरण करण्यात येणार आहे. सर्व आरोग्यविषयक योजनांचा लाभ एकाच प्रणालीत उपलब्ध होणार आहे. पात्रता, कागदपत्रे आणि अर्जप्रक्रिया एकसंध झाल्याने रुग्णांची गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होईल. त्यासोबतच निधी व रुग्णालयांमधील समन्वय वाढून मदत मिळण्याचा वेग वाढणार आहे. एकत्रित आरोग्य सहाय्य मॉडेलमुळे गरीब व गरजू नागरिकांना योग्य वेळी योग्य योजना मिळवणे अधिक सोपे होणार आहे.

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या वैद्यकीय उपचारांचा लाभ देता यावा, यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या पुढाकारातून त्रिपक्षीय करार लवकरच करण्यात येणार आहे. यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, कॉर्पोरेट कंपनी, रुग्णालय आणि काही प्रमाणात रुग्णांचे योगदान अपेक्षित असणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षात वर्षभरात केलेल्या सुधारणा प्रत्यक्ष रुग्णांपर्यंत पोहोचल्या. ऑनलाइन प्रक्रिया सोपी करणे, जिल्हा कक्षांची स्थापना आणि इतर नवीन उपक्रमांमुळे हजारो रुग्णांना वेळेवर मदत मिळत आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणाचाही उपचार थांबू नये, हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संकल्प पूर्ण क्षमतेने प्रत्यक्षात उतरतो आहे.

# विक्रम-मिनिडोअर चालक-मालकांचा संताप उसळला; जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चा

**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**



**अलिबाग ।** अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे सरकारकडून वारंवार होत असलेली दिरंगाई आणि प्रशासनाकडून सातत्याने होणाऱ्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या रायगड जिल्ह्यातील विक्रम, मिनिडोअर व टॅक्सी चालक-मालकांनी आज (१२ डिसेंबर २०२५) अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. या मोर्चाचे नेतृत्व जिल्ह्यातील संघटनाध्यक्ष विजय भाऊ पाटील यांनी केले. जिल्ह्याच्या विविध तालुक्यांतून तब्बल हजारो विक्रम-मिनिडोअर चालक-मालक मोठ्या संख्येने यात सहभागी झाले.

मागील अनेक वर्षांपासून विक्रम-मिनिडोअर चालक-मालकांच्या गंभीर प्रश्नांवर सरकार पातळीवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. यापूर्वी १७ मार्च २०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. ना. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक घेण्यात आली होती. त्या मध्ये प्रमुख मागण्यांवर चर्चा होऊन तातडीने अंमलबजावणीचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, दोन ते तीन वर्षे उलटूनही एकाही निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याचे चालक-मालकांचे म्हणणे आहे.

यानंतर २२ ऑगस्ट २०२५ रोजी परिवहन आयुक्तांच्या दालनात बैठक झाली. तसेच १४ ऑक्टोबर २०२५ रोजी मंत्री भरतशेठ गोगावले यांनी परिवहन मंत्र्यांकडे तातडीची बैठक घेण्याची विनंती केली. परंतु आजपर्यंत एकही बैठक न घेतल्याने दिरंगाई जाणवून येत असल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला.

मोर्चेकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात शासनाच्या नियमांनुसार वयोमर्यादा पूर्ण झाल्यानंतर विक्रम-मिनिडोअर वाहन स्क्रॅप करावे लागते. परंतु ६+१ बदली मॉडेल उपलब्ध नसल्याने परवाना रद्द होतो आणि चालक बेरोजगार होतात. तरी ठढ- ग्रामीण भागासाठी वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवावी, अशी प्रमुख मागणी आहे. दरवर्षी १०-१२ हजार रुपये देऊन बसविलेला तडढऊडिव्हाईस न स्वीकारता पुन्हा नवीन डिव्हाईस लावण्याचा आदेश देण्यात येत आहे. म्हणजेच -डिव्हाईस कंपन्यांमध्ये संगनमत असल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी केला. कर भरण्यास उशीर झाला तर रोजच्या रोज दंड आकारला जातो. पण सरकारी स्तरावर दोन-तीन वर्षे निर्णय न घेण्यास कोणावरही कारवाई नाही, असा सवाल संघटनेने उपस्थित केला.

# खारघरमध्ये इलेक्ट्रिक बस सेवा ठप्प: शिवसेना पक्षाने त्वरीत चार्जिंग स्टेशन चालु करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर शहरातील नवी मुंबई महानगर पलिकेच्या परिवहन सेवेच्या इलेक्ट्रिक बस सेवा गेल्या काही दिवसांपासून वारंवार ठप्प होत असल्याने नागरिकांना गंभीर गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. बस वेळेवर चार्जिंग न झाल्यामुळे निर्धारित वेळापत्रकानुसार फेऱ्या चालवल्या जात नसल्याने प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत आहे. याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने त्वरीत चार्जिंग स्टेशन चालु करण्याची मागणी केली आहे.

या विस्कळीत व्यवस्थेमुळे शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे आणि नोकरीसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचे हाल होत आहेत. सकाळच्या गर्दीच्या वेळेत बस उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थी उशिरा शाळेत पोहोचण्याच्या घटना वाढल्या आहेत तर नोकरीसाठी प्रवास करणाऱ्यांना पर्यायी प्रवास साधनांचा वापर करावा लागत आहे. याशिवाय, वेळेअभावी वयोवृद्ध नागरिकांना बस थांब्यावर दीर्घकाळ ताटकळत बसावे लागत आहे, ही बाब नागरिकांच्या भावनांना चटका लावणारी ठरत आहे. खारघर हे वेगाने विस्तारत असलेले आणि नियोजनबद्ध शहर असून येथे सार्वजनिक वाहतूक ही नागरिकांची मूलभूत गरज आहे. इलेक्ट्रिक बस सेवा आधुनिक, पर्यावरणपूरक आणि वेगवान वाहतूक सुविधा म्हणून अपेक्षित असताना पुरेशा क्षमतेच्या चार्जिंग सुविधांचा अभाव ही गंभीर समस्या ठरत आहे. अनेक बस पहिल्या फेरीनंतर चार्जिंगमुळे डेपोमध्येच थांबतात आणि सेवा ठप्प होते, अशी माहिती नागरिकांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खारघर उपशहर प्रमुख नंदु वारुंगसे यांनी परिवहन व्यवस्थापक, नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम यांना लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनात वारुंगसे यांनी खारघर शहरात आधुनिक आणि स्वतंत्र एनएमएमटी बस चार्जिंग स्टेशन तात्काळ उभारण्याची मागणी केली आहे. या संदर्भात वारुंगसे म्हणाले की, खारघरमधील नागरिकांना बससेवेचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. बस चार्जिंग सुविधांचा अभाव हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे उदाहरण आहे. चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी तात्काळ निर्णय घेतल्यास बस सेवा नियमित होईल आणि नागरिकांना दिलासा मिळेल. सध्या एनएमएमटी प्रशासनाकडे ही मागणी औपचारिकरित्या पोहोचली असून बस चार्जिंग स्टेशन उभारणीसंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.खारघरमध्ये वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करता बस सेवा सुरळीत ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत नागरिक, सामाजिक संघटना आणि विद्यार्थी व्यक्त करत आहेत.

# भोईघर -टेंभोर्डे रस्त्याचे रखडलेले काम तातडीने न झाल्यास आंदोलन करणार : रमेश नागांवकर

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई ।** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झालेल्या मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील भोईघर -टेंभोर्डे रस्त्याची कामे पाच सहा वर्षांपासून रखडलेली असून अत्यंत दयनीय अवस्था असून या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण न झाल्यास तीव्र जन आंदोलन करणार असल्याचा इशारा तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रमेश उर्फ बाबू नागांवकर यांनी दिला आहे.याबाबत ग्रामपंचायत सरपंच यांनी रायगड -अलिबाग येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता यांना एक पत्र देऊन या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात मागणी करण्यात आली आहे

तालुक्यातील भोईघर ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील भोईघर ते टेंभोर्डे रस्ता डांबरीकरण करणे हे काम शासनाचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत मंजूर असून सदरचे ठेकेदार यांनी काम अद्याप पर्यंत पूर्ण केलेले नाही. त्यामुळे तेथील ग्रामस्थांना जाणे-येणे प्रवास करता येत नाही व गावात रस्ता खराब असल्याने एस टी देखील गावात येणे आता बंद होणेचे मार्गावर आहे त्यामुळे सदरचे कामाची मुदत संपलेली असल्याने पुन्हा नव्याने निविदा प्रकिया करणे व सदरचे काम लवकरात पूर्ण करण्यात यावे.याबाबत ग्रामपंचायत ग्रामसभेत ठराव करण्यात आला असून माजी सभापती रमेश नागावकर यांनी रस्ता डांबरीकरण व कॉंक्रिटिकरणासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.परंतु अद्यापही या रस्त्याच्या दुरावस्थेकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष दिसून येते आहे.

शासनाच्या संबंधित बांधकाम खात्याने यात तातडीने लक्ष पुरवून भोईघर -टेंभोर्डे रस्त्याचे काम तातडीने पूर्ण न झाल्यास नाईलाजास्तव याविरोधात तीव्र जन आंदोलन करणार असल्याचा इशारा तालुका पंचायत समितीचे माजी सभापती रमेश नागावकर यांनी दिला आहे.

# मौजे नागाव वर्तकअळी येथील नागरिकांना वनविभाग अलिबाग कार्यालयाच्या मार्गदर्शक सूचना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दि.०९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मौजे नागाव वर्तकअळी येथे स्थानि ५ ग्रामस्थांना बिबट्या दिसून आल्याची बातमी वनविभाग अलिबाग यांना प्राप्त झाली. त्यानुसार वनविभाग, पोलीस विभाग आणि रेस्क्यू तज्ञांनी (दि.०९ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळपासून ते आज दि.१० डिसेंबर २०२५रोजी) पर्यंत सर्चिंग व कोम्बींग ऑपरेशन राबविले व आजतागायत सुरू आहे.

या ऑपरेशन दरम्यान बिबटया आढळून आलेला नाही. प्राथमिक अंदाजानुसार हा बिबट्या आपल्या नैसर्गिक अधिवासात निघून गेला असण्याची शक्यता आहे तरी देखील ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी वनविभाग अलिबाग पुढील काही दिवस या परिसरात दिवस व रात्र गस्त करणार आहे. याकरिता उप वनसंरक्षक अलिबाग यांनी ग्रामस्थांना पुढीलप्रमाणे मागदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

कोणत्याही संशयास्पद हालचाली अथवा प्राणी निदर्शनास आल्यास तात्काळ स्थानिक वनविभागास कळवावे, रात्रीच्या वेळेस गरज असल्यास शक्यतो गटाने किंवा प्रकाशातच वावर करावा, घराभोवती परिसर स्वच्छ ठेवा, जनावरांची विसर्जन स्थळे व कचरा खुले ठेवू नका. पाळीव जनावरे सुरक्षित गोठ्यात बांधून ठेवा. शेतात किंवा मोकळ्या जागेत जाण्यापूर्वी टॉर्च लाईटचा वापर करा. बिबट्याचा पाठलाग, फोटो काढणे किंवा जवळ जाण्याचा प्रयत्न करु नये. अफवा पसरवणे,चुकीची माहिती सोशल मिडीयावर शेअर करणे टाळावे. प्राण्याला चिथावणी देईल अशी ओरडाओरड करु नये, दगडफेक, धावाधाव करु नये. लहान मुलांना बाहेर एकटे न पाठवणे, पाळीव जनावरे जंगलाच्या कडेला बांधून ठेवू नयेत.

दि.०९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मौजे नागाव वर्तकअळी येथे स्थानि ५ ग्रामस्थांना बिबट्या दिसून आल्याची बातमी वनविभाग अलिबाग यांना प्राप्त झाली. प्राप्त माहिती नंतर वनविभागाची पथके तात्काळ घटना स्थळी दाखल झाली.

या घटनेची माहिती मिळताच उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन सहा. वनसंरक्षक, अलिबाग श्री.जवरे व वनक्षेत्रपाल अलिबाग नरेंद्र पाटील यांना परिस्थितीचा आढावा घेऊन कार्यवाहीसाठी मार्गदर्शनपर सुचना दिल्या. वन्यजीव बचावासाठी पुणे व रोहा येथील वन्यजीव रेस्क्यू तज्ञांची पथके त्वरीत घटनास्थळी बोलावण्यात आली.

नागाव ग्रामपंचायत सरपंच, नागाव ग्रामस्थ यांनी या ऑपरेशन मध्ये वनविभागास सहकार्य करीत आहे. वनविभाग या परीस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून पुढील कार्यवाही करीत आहे. वन विभाग अलिबाग वनक्षेत्र अलिबाग याव्दारे नागरीकांना सतर्क व सुरक्षित राहण्याबाबत जाहीर आवाहन करीत आहे.

# सायबर गुन्ह्यातील आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी केली अटक

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल ।** पनवेल शहर पोलीस स्टेशन सायबर पथकाने सायबर गुन्ह्यात ५ लाख १४ हजार ५०० रुपयाची फसवणूक करणाऱ्या आरोपीला अटक केली आहे. फिर्यादी संतोष अस्वले यांनी टाटा स्टीलची खरेदी करण्याकरीता गुगल वर नंबर शोधून आरोपी यास ऑर्डर देऊन त्यांना आरोपी याने खोटे इन्व्हाईस पाठवून त्यांची एकूण ५,१४,५००/ इतके रुपयाची फसवणूक केली होती. नमूद गुन्ह्याचा तांत्रिक तपास करून टाटा स्टील मॅन्युफॅक्चरिंग प्लांट या कंपनीचा नावाने मोबाईल क्रमांक सेसश्रश रवी मध्ये अपलोड केलेला आरोपी सूर्यांश सहज सिंह (वय २२ वर्षे, रा. सुलतानपूर, उत्तर प्रदेश) याचे लोकेशन सुलतानपूर उत्तर प्रदेश येथे होते. त्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्यातील वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदशनाखाली पो उप निरी. अभय कदम, पोहवा थवई, पो.शि. गायकवाड, पो.शि. मेरया, पो.शि. पालवे, पो.ना. प्रवीण पाटील हे सायबर पथक सुलतानपूर, उत्तर प्रदेश येथे रवाना झाले. पथक सुलतानपूर, उत्तर प्रदेश येथे पोहोचल्यावर नमूद आरोपी हा नैनीताल, उत्तराखंड येथे जात असल्याचे लोकेशन द्वारे समजले.

तरी सायबर पथक तात्काळ रात्रीचा प्रवास करून सुलतानपूर ते नैनिताल असे ५०० कि.मी. प्रवास करून भीमताल पोलीस ठाणे, नैनिताल येथे पोहोचले. नैनिताल येथील पोलिस अमलदार जितू ठाकूर यांच्या मदतीने आरोपी सूर्यांश सहज सिंह (वय २२ वर्षे, रा. सुलतानपूर, उत्तर प्रदेश) यास भिमताल पोलीस ठाणे हद्दीत आरोपी मिळून आल्याने त्याचा ताबा घेतला. त्याच्या ताब्यात मोबाईल डिव्हाईस व लॅपटॉप मिळून आला. सदर आरोपी हा गुगल ॲड्स व वेबसाईट तयार केल्याचे त्याच्या लॅपटॉप व मोबाईल मध्ये मिळून आले आहे. तसेच मुख्य आरोपी सोबत चॅट मिळून आले आहेत. सदर आरोपी विरोधात पुरेसे तांत्रिक पुरावे प्राप्त झाले असून त्यास अटक करून मा. न्यायालय, नैनिताल, उत्तराखंड यांच्यासमक्ष हजर करून ट्रान्झिट रिमांड घेण्यात आली. पुढील तपास पो उप निरी. अभय कदम,करीत आहेत.

# सरकारी नोकरीचे आमिष; महिलेची साडेचार लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल स्टाफ नर्स म्हणून खात्रीशीर सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका भामट्याने खांदा कॉलनीत राहणाऱ्या महिलेकडून ४ लाख ५० हजारांची रक्कम उकळून तिला बनावट जॉइनिंग लेटर पाठवून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अनिकेत धनंजय पाठक असे या भामट्याचे नाव असून, खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या भामट्याने अशाच पद्धतीने अनेकांना गंडा घातल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणातील तक्रारदार या खांदा कॉलनीत कुटुंबासह राहण्यास आहेत. तर आरोपी अनिकेत पाठक हा दौंड भागात राहण्यास असून, तो सध्या येरवडा येथील मनोरुग्णालयात कार्यरत आहे. २०१३ साली माया गायकवाड नाशिक येथे नर्सिंगचा कोर्स करत असताना, तिची आरोपी अनिकेत पाठक याच्याशी ओळख झाली होती. याच ओळखीचा फायदा उचलत त्याने मे २०२४ मध्ये सरकारी नोकरीला लावण्याचे आमिष दाखवले होते. काही मुलांना नोकरीला लावल्याचेही त्याने सांगितले.

पाठकच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्याच्या खात्यावर ४ लाख ५० हजार रुपये ऑनलाइन पाठवले. त्यानंतर पाठक याने डिसेंबर २०२४ मध्ये बनावट ई-मेलवरून तिला संभाजीनगर येथील सरळ सेवा अधिपरिचारिका (गट-क) या पदाचे बनावट जॉइनिंग लेटर पाठवून देत तिचा विश्वास संपादन केला. त्यात ३० दिवसांच्या आत नोकरीच्या ठिकाणी हजर होण्याबाबत मजकूर असताना, पाठक याने तिला नोकरीच्या ठिकाणी जाऊ दिले नाही. त्यानंतर गत एप्रिल महिन्यात पाठक याने खांदेश्वर रेल्वे स्टेशनजवळ भेट घेऊन तिला दुसरी बनावट जॉईनिंग ऑर्डर दिली. मात्र, त्याठिकाणी हजर न होण्यास व तो सांगेल, तेव्हा हजर होण्यास सांगितले.

दुसऱ्या ऑर्डरमधील जॉईनिंगची तारीख निघून गेल्यानंतर पाठक याने औरंगाबाद येथे झालेला भरती घोटाळा उघडकीस आल्याचे सांगून तिचे काम होणार नसल्याचे सांगितले. ऑगस्ट महिन्यात ५ लाख रुपये किमतीचा चेक दिला, मात्र तो चेक बाऊन्स झाला. त्यांनतर त्याने पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी अनिकेत पाठक या भामट्याविरोधात खांदेश्वर पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार दाखल केली.

# श्रीवर्धन शहरात येणाऱ्या सहलीच्या बसेस अवधूत मंदिर परिसरात बनवितात जेवण

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

डिसेंबर महिना सुरू असल्यामुळे महाराष्ट्राच्या विविध भागातून श्रीवर्धन येथे सहलीच्या बसेस मोठ्या प्रमाणावर येत आहेत. एका एका शाळेच्या पाच ते सहा बस गाड्या येत असल्याने, शहरात बस गाड्या घुसल्याने अरुंद रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी नेहमीच होत आहे. या वाहतूक कोंडीचा त्रास स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे. शाळांच्या सहलींबरोबरच अनेक यात्रा कंपन्यांच्या सहलीच्या बसेस देखील श्रीवर्धन शहरात येत आहेत. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात पर्यटक येऊन सुध्दा इथल्या हॉटेल व्यवसायिकांना कोणत्याही प्रकारचा व्यवसाय प्राप्त होत नाही.

कारण येणाऱ्या सर्व गाड्यांमध्ये जेवण बनवण्याचे साहित्य पूर्णपणे आणलेले असते. तसेच याबरोबर आचारी देखील आणलेले असतात. सहलीचे आयोजन करणारे अवधूत मंदिर परिसरात बस उभ्या करून त्या ठिकाणी उघड्यावरती जेवण बनवण्याचे प्रकार अनेक वेळा दिसून येतात. अवधूत मंदिराच्या बाजूला दहावे, बारावे इत्यादी उत्तर कार्य करण्यासाठी जागा राखीव आहे. मात्र याच जागेवरती जेवण बनवून जागा, संपूर्ण परिसर अस्वच्छ करण्यात येतो. याबाबत श्रीवर्धन नगरपरिषदेला अनेक वेळा सूचना देऊनही नगर परिषदेकडून कोणत्याही प्रकारचा सूचनाफलक त्या ठिकाणी लावण्यात आलेला नाही.

पर्यायाने येणारे पर्यटक समुद्रकिनाऱ्यावर कोणत्याही जागी जेवण बनवताना आढळून येतात. सदरची जागा दिवस कार्य करण्यासाठी, त्याचप्रमाणे उत्तर कार्य करण्यासाठी आरक्षित असल्यामुळे त्या ठिकाणी पाण्याची सोय उपलब्ध आहे.रात्रीच्या वेळी त्या ठिकाणी मोठा हॅलोजन लाईट असल्यामुळे उजेड सुध्दा असतो. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना अजूनच सोयीचे होऊन जाते. अवधूत मंदिर हे अत्यंत जागृत देवस्थान आहे. परंतु अनेक वेळा येणाऱ्या पर्यटकांकडून या परिसरामध्ये मांसाहारी जेवण देखील बनवण्यात येते. त्यामुळे मंदिराचे पावित्र्य बाधित होत आहे. याबाबत स्थानिक प्रशासनाने येणाऱ्या पर्यटकांना त्या ठिकाणी जेवण न बनविण्याबद्दल सूचना द्याव्यात व त्या ठिकाणी एक सूचनाफलक देखील कायमस्वरूपी लावण्यात यावा. अशी मागणी शहरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.